मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 25 मार्च 2026 | पान- 1


# महापालिकेच्या अर्थसंकल्पात 414 कोटींची वाढ

## 1100 नवीन उपसूचनांचा समावेश, नगरसेवकांना प्रत्येकी 10 लाखांचा निधी



### महत्त्वाचे प्रकल्प

- महिला स्वसंरक्षण केंद्र - ५ कोटी
- डिजिटल स्कूल (सीबीएसई दर्जा) - २ कोटी
- रतन टाटा म्युझियम - २ कोटी
- 'अजितसृष्टी' स्मारक - ५ कोटी
- आरोग्य हेल्पलाईन - ३ कोटी
- सोलर प्रकल्प - ५ कोटी
- पवना रिव्हर फ्रंट - १५ कोटी
- मलनिस्सारण सुधारणा - २० कोटी
- ई-व्ही चार्जिंग स्टेशन - १.५ कोटी

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सन २०२६-२७ च्या ९३२२.१७ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकात ४१४.२२ कोटी रुपयांची वाढ सुचविण्यात आली असून, स्थायी समितीमार्फत ते मंजुरीसाठी सभेकडे ठेवण्यात आले आहे. जुन्या कामांसाठी १३०० कोटी तर नवीन कामांसाठी २०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी हे अंदाजपत्रक महापौर रवी लांडगे यांच्याकडे सादर केले. महापौर रवी लांडगे यांनी सर्वसाधारण सभेत मंगळवारी (दि.२४) मंजुरी दिली. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसचिव मुकेश कोळप आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने बांधकाम परवानगी विभागात २५८ कोटींची वाढ अपेक्षित आहे. शासकीय मोजणी व 'ना हरकत' दाखले प्रक्रिया पुन्हा सुरू झाल्याने गृह व व्यावसायिक प्रकल्पांना गती मिळाली आहे. मालमत्ता करातून ५० कोटी, होर्डिंग परवान्यांतून ३४ कोटी, पाणीपट्टीतून २० कोटी आणि इतर स्रोतांतूनही उत्पन्न वाढण्याचा अंदाज आहे.

**प्रभागनिहाय विकासाला चालना**

शहरातील ३२ प्रभागांतील सुमारे ११०० नवीन कामांचा अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला असून, त्यासाठी १९६.९० कोटींची तरतूद आहे. यासोबतच प्रत्येक नगरसेवकाला प्रभागातील तातडीच्या कामांसाठी १० लाख रुपयांचा स्वतंत्र निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १२८ नगरसेवकांसाठी एकूण १३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीतून रस्ते, गटारे, पदपथ दुरुस्ती, उद्यान सुशोभीकरण यांसारखी कामे स्थानिक पातळीवर जलद पूर्ण होणार आहेत.

**पाणीपुरवठा व पायाभूत सुविधांवर भर**

पवना धरणातून निगडीपर्यंत समांतर जलवाहिनी टाकण्याचा १०० कोटींचा प्रकल्प हाती घेण्यात येणार असून, यावर्षी ४० कोटींची तरतूद आहे. शहराला सध्या ६५८ एमएलडी पाणीपुरवठा होत असून, गळती रोखणे व शुद्ध पाणी देण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जाणार आहेत.

**सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम**

बेघरांसाठी निवारे, सॅनिटरी नॅपकिन मशीन, ऑक्सिजन पार्क, रेन वॉटर हार्वेस्टिंग, कामगार कट्टे, हॉकर्स झोन अशा उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे.

**वाहतूक व शहर विकास**

शहरातील चौक सिग्नलमुक्त करण्याचे नियोजन, 'पे अँड पार्क' धोरण, तसेच बीआरटी कॉरिडॉरमधून ४० कोटींची वाढ अपेक्षित असून, उड्डाणपूल व ग्रेड सेपरेटर प्रकल्पांना चालना मिळणार आहे.

**भटक्या श्वानांसाठी निवारागृह**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ५ हजार श्वान क्षमतेची निवारागृहे उभारण्यात येणार असून, त्यासाठी ६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

---

# PMPML बस कंत्राट प्रक्रिया संशयाच्या घेऱ्यात, दोषींवर कठोर कारवाई करा

## आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात वेधले सरकारचे लक्ष




**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या कार्यपद्धतीवर आणि सीएनजी बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रक्रियेतील पारदर्शकतेवर आमदार अमित गोरखे यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विधानपरिषदेत त्यांनी या प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहार आणि प्रशासकीय अनागोंदीवर सरकारचे लक्ष वेधले.

पीएमपीएमएलच्या निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक आहे. नियमानुसार सुरक्षा ठेव म्हणून 'बँक गॅरंटी' स्वीकारणे अपेक्षित असताना, केवळ 'चेक' स्वीकारण्यामागील नेमकी तांत्रिक बाजू काय आहे, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने देणे गरजेचे आहे. तसेच, सीएनजी बस खरेदीचा करार ज्या वेगाने पूर्ण झाला, त्यामागे नेमकी प्रशासकीय निकड काय होती, यावरही प्रशासनाने प्रकाश टाकावा. एकाच कंत्राटदाराला सातत्याने मोठी कामे मिळणे, हे त्या कंत्राटदाराच्या कार्यक्षमतेचे निदर्शक असू शकते, मात्र या संपूर्ण प्रक्रियेत नियमांचे पालन झाले आहे का, याची सखोल शहानिशा होणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रशासनाने या सर्व बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन वस्तुस्थिती समोर आणावी, अशी आग्रही मागणी आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात केली आहे.

या विषयावर उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी ही प्रक्रिया पारदर्शक असल्याचे सांगत, तत्कालीन सीएमडी देवरे यांची बदली झाल्याचा उल्लेख केला. मात्र, केवळ बदलीने ही जबाबदारी संपत नाही. या निविदा प्रक्रियेला मान्यता कोणाकोणी दिली, त्यामागील तारखांचा मेळ काय आणि चेक स्वीकारण्याचा निर्णय कोणत्या अधिकाऱ्याने घेतला, या सर्व बाबींची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

आमदार अमित गोरखे यांनी या संपूर्ण प्रकरणात पुराव्यानिशी चौकशीची मागणी केली आहे. जनतेच्या हितासाठी आणि पारदर्शकतेसाठी या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत हा लढा सुरूच राहील, असे प्रतिपादन आमदार अमित गोरखे यांनी केले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 143 नाल्यांची सफाई सुरु

## पूरस्थिती टाळण्यासाठी तयारी; 30 एप्रिलपर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या वर्षी पावसाळ्यात शहरातील अनेक भागात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. यंदा तशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून महापालिका प्रशासनाने शहरातील सर्व लहान-मोठे असे एकूण 143 नाले सफाईला सुरुवात करण्याची सूचना आरोग्य विभागाने आठही क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पुढील एप्रिल महिनाभरात सर्व नाले स्वच्छ करण्यात येणार आहेत.




शहरामध्ये 2 ते 11 मीटर रुंदीचे 100 किलोमीटर अंतराचे एकूण 143 नैसर्गिक नाले आहेत. हे नाले शहरातील पवना, मुळा आणि इंद्रायणी या नद्यांना जाऊन मिळतात. सर्व नाले उघडे असल्याने या नाल्यांमध्ये राडारोडा, प्लास्टिक, भंगार व टाकाऊ साहित्य फेकले जाते. अनेक नागरिक कचरा या नाल्यांमध्ये टाकतात. या नाल्यात गाळ साचल्याने नाले अरुंद व उथळ होतात. परिणामी पावसाळ्यात पाणी वाहून नेण्याची त्यांची क्षमता कमी होते. पावसाळ्याचे पाणी वाहून न गेल्याने ते साचून परिसरातील घर, हाऊसिंग सोसायट्या व दुकानांमध्ये शिरते. त्यात नागरिकांचा मोठे नुकसान होते.

पावसाळ्यामध्ये शहरात पूर स्थिती निर्माण होऊ नये, म्हणून आरोग्य विभागाकडून दरवर्षी सर्व नाले, पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या (स्ट्रॉम वॉटर लाईन), चेंबर्स आणि गटार स्वच्छ केले जातात. गेल्या वर्षी पावसाळ्यात चिखली, रूपीनगर, पिंपळे गुरव, नवी सांगवी, सांगवी, पिंपरीतील भाटनगर, दापोडी, चिंचवड गावासह अनेक भागात पुराचे पाणी शिरले होते. त्यामुळे शेकडो नागरिकांचे स्थलांतर करण्याची वेळ महापालिकेवर आली होती. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात पूर परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष खबरदारी घेण्यास सुरूवात झाली आहे.

साधारणपणे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये पावसाला सुरुवात होते. मात्र, गतवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात पावसाला सुरूवात झाली होती. त्यामुळे उन्हाळ्यातच हे काम पूर्ण करणे गरजेचे झाले आहे. त्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून स्थापत्य विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयांना याबाबत कळविण्यात आल आहे. नालेसफाई कामकाजाची माहिती गुगल स्प्रेडशिटमध्ये दर आठवड्याला भरून किती टक्के नालेसफाई झाली, याची अद्ययावत माहिती द्यावी, अशी सूचनाही आरोग्य विभागाने केली आहे.

### तीस एप्रिलपर्यंत सर्व नाले साफ करणार

» नालेसफाई करण्याच्या सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. जेसीबी, पोकलेन व स्पायडर मशिनने सफाई केली जाईल. ज्याठिकाणी अरुंद नाले आहेत, तिथे मशिन जात नाही अशा नाल्यांमध्ये सुरक्षेची सर्व साधने वापरून मनुष्यबळाद्वारे सफाई करण्याच्या योग्य त्या सूचना दिल्या आहेत. नालेसफाईपूर्वीचे व नंतरचे छायाचित्रे घेतली जाणार आहेत. प्रत्येक आठ दिवसांनी नालेसफाईची आढावा घेण्यात येणार आहे. 30 एप्रिलपर्यंत नालेसफाईचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

# देहूरोड ते सुतारवाडी ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ वर विधानसभेत शिक्कामोर्तब

## आमदार शंकर जगताप; पिंपरी चिंचवड, हिंजवडीसह पश्चिम पुण्याची वाहतूक कोंडी फुटणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातून जाणाऱ्या मुंबई-बंगळूर महामार्गावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नवले पुलाला जोडणारा देहूरोड ते सुतारवाडी असा सुमारे १५.८७ किलोमीटर लांबीचा सहा पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर (उड्डाणपूल) प्रस्तावित करण्यात आला आहे. यामुळे पिंपरी चिंचवड, हिंजवडी आयटी पार्कसह लगतच्या उपनगरांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.



महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान मंगळवारी पुण्यातील नवले उड्डाणपुलाच्या सद्यस्थिती बाबत सभागृहात प्रश्न विचारण्यात आला होता. या अनुषंगाने आमदार शंकर जगताप यांनी नवले ब्रिज पासून सुतारवाडी ते देहूरोड या एलिव्हेटेड कॉरिडॉर संदर्भातील कामाबाबत विचारणा केली. यावर उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी या महत्वाकांक्षी प्रकल्पाची माहिती दिली.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांची कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून (NHAI) विविध उपाययोजना केल्या जात आहेत. देहूरोड ते सुतारवाडी या मार्गाचे भूसंपादन, सेवा रस्त्यांचे रुंदीकरण आणि डांबरीकरण या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे असेही आमदार जगताप यांनी सांगितले. नाशिक फाटा ते खेड या आठ पदरी एलिव्हेटेड मार्गाच्या धर्तीवर हा प्रकल्प साकारला जाणार असून, आगामी काळात पिंपरी चिंचवड शहरातून जाणाऱ्या मुंबई-बंगळूर महामार्गावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी हा रस्ता मैलाचा दगड ठरणार आहे.

“ पिंपरी-चिंचवड आणि हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी देहूरोड ते सुतारवाडी हा १५.८७ किलोमीटरचा एलिव्हेटेड कॉरिडॉर अत्यंत महत्त्वाचा आहे. या प्रकल्पामुळे केवळ प्रवास वेगवान होणार नाही, तर शहराच्या कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळणार आहे. शासनाने या कामाला गती देऊन भूसंपादन आणि सेवा रस्त्यांचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावावेत, हीच आमची आग्रही मागणी आहे.सेवा रस्त्यांचे रुंदीकरण आणि या उड्डाणपुलामुळे भविष्यातील वाहतुकीचे नियोजन अधिक सक्षम होईल. हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

– शंकर जगताप, आमदार,
चिंचवड विधानसभा मतदारसंघ.

### हिंजवडी आयटी हबसाठी वरदान..

» हिंजवडी आयटी पार्क आणि लगतच्या गावांमध्ये वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस जटील होत आहे. या प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉरमुळे वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत या पिंपरी-चिंचवडमधील भागांसह बालेवाडी, बाणेर, सुस आणि बावधन या पुणे शहराच्या भागांतील प्रवास गतिमान होणार आहे. तसेच माण, मारुंजी, नेरे, जांबे, कासारसाई आणि किवळे या परिसरातील नागरिकांनाही याचा मोठा लाभ मिळेल.

# महापालिकेत 90 विषयांना मंजुरी

## सर्वसाधारण सभेत विविध निर्णय; लोहगावमध्ये कन्व्हेन्शन सेंटर उभारणीला मान्यता

**पुणे | प्रतिनिधी**

चार वर्षांच्या प्रशासक कालावधीनंतर पुणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवारी पार पडली. या महत्त्वाच्या सभेत तब्बल 90 विषय कार्यपत्रिकेवर ठेवण्यात आले होते. त्यांपैकी 90 विषयांना मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात विषय मंजूर करण्यात आल्याची माहिती सभागृहनेते गणेश बिडकर यांनी दिली. कोणताही विषय प्रलंबित न ठेवता सर्व कामकाज पूर्ण करण्यात आले असून, नाईक बेटाचा विषय दफ्तरी दाखल करून चुकीचा पायंडा पडू दिला नसल्याचे बिडकर यांनी सांगितले.




सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत विविध महत्त्वाच्या प्रस्तावांवर निर्णय घेण्यात आला. सूस-खिंड रस्त्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मात्र, हे काम ठरावीक ठेकेदाराला दिल्याच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षाने नाराजी व्यक्त केली. सभेत विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. काही विषय राज्य सरकारच्या निर्णयाधीन असल्याने ते दफ्तरीदाखल करण्यात आले, तर उर्वरित विषयांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले.

नव्या प्रस्तावांवर प्रक्रिया करून आठ दिवसांत निर्णय घेण्याच्या सूचना देखील आयुक्तांना देण्यात आल्याचे बिडकर यांनी सांगितले. बिडकर म्हणाले, 'भारत मंडपम' संकल्पनेच्या अनुषंगाने पुण्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. लोहगावमध्ये यासाठी जागा निश्चित करण्यात आली असून, विद्यमान आरक्षणांमध्ये कोणतीही कपात होणार नाही. विरोधक उगाच यावरून कांगावा करीत आहेत.

या कन्व्हेन्शन सेंटरमध्ये 50 हजार वाहनांची व्यवस्था असेल असे वाहनतळ बांधण्यात येणार आहे. तसेच, येथे चांगल्या दर्जाचे उद्यान देखील उभारण्यात येणार आहे. तसेच, हॉस्पिटल आणि भाजी मंडईसाठी असलेली आरक्षणे दोन किलोमीटरच्या परिसरात इतर ठिकाणी 'ॲमेनिटी स्पेस'मध्ये स्थलांतरित करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे नागरिकांच्या मूलभूत सुविधांवर कोणताही परिणाम होणार नाही, असा दावा देखील बिडकर यांनी केला आहे.

या प्रकल्पासाठी निवडलेली जागा विमानतळाच्या उंची मर्यादांमुळे मोठ्या इमारतींसाठी मर्यादित असल्याने कन्व्हेन्शन सेंटरसाठी ती योग्य असल्याचे सांगण्यात आले. तसेच, या ठिकाणी विमानतळ, मेट्रो, हॉटेल्स आणि रुग्णालयांची चांगली कनेक्टिव्हिटी असल्याने भविष्यात मोठ्या कार्यक्रमांसाठी हे केंद्र महत्त्वाचे ठरणार आहे. या कन्व्हेन्शन सेंटरमध्ये एकावेळी सुमारे 30 हजार लोकांची क्षमता असलेले कार्यक्रम आयोजित करता येतील. राजकीय सभा, सामाजिक कार्यक्रम आणि आंतरराष्ट्रीय परिषदांसाठी हे केंद्र उपयोगी ठरणार असल्याचे बिडकर म्हणाले.

# पुण्यात 'भारत मंडपम' प्रकल्प मंजूर

## 48 एकर जागेवरील आरक्षण बदलास विरोध; 143 विरुद्ध 18 मतांनी प्रस्तावाला मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

लोहगाव विमानतळालगतच्या 48 एकर जागेवरील नागरीहिताची विविध आरक्षणे वगळून 'भारत मंडपम' या सांस्कृतिक केंद्राचे आरक्षण टाकण्याचा प्रस्ताव सोमवारी मुख्य सभेत बहुमताने मंजूर करण्यात आला. परंतु, काँग्रेससह शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने 'भारत मंडपम'ची जागा बदलावी, अशी मागणी करीत या प्रस्तावाला विरोध केला, तर भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसने या प्रस्तावाला पाठिंबा दिला. त्यामुळे 18 विरुद्ध 143 अशा बहुमताने हा प्रस्ताव मंजूर झाला.



दिल्लीतील 'भारत मंडपम' या संकुलाच्या धर्तीवर पुण्यातही 'भारत मंडपम' उभारण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने महापालिकेकडे पाठविला आहे. त्यानुसार मनपा प्रशासनाने लोहगाव सर्व्हे नंबर 236,238 येथील 48 एकरावरील रुग्णालये, वाहनतळ, मंडई, रस्ते अशी आरक्षणे बदलून त्यावर 'भारत मंडपम'चे आरक्षण टाकण्याचा प्रस्ताव मुख्य सभेपुढे मंजुरीसाठी ठेवला होता. या प्रस्तावावरील चर्चेदरम्यान काँग्रेससह दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेच्या (उबाठा) नगरसेवकांनी 'भारत मंडपम'ला आमचा विरोध नाही. मात्र, लोहगाव परिसरात नागरीहिताची आरक्षणे वगळून हे आरक्षण टाकणे चुकीचे होईल, अशी भूमिका घेतली.

त्यामुळे समाविष्ट गावांमध्ये अन्य जागांवर हे आरक्षण टाकावे, अशी मागणी या नगरसेवकांनी केली. नगरसेवक प्रशांत जगताप, अरविंद शिंदे, नंदिनी धेंडे, सुहास टिंगरे, अविनाश साळवे, दत्तात्रय धनकवडे, अमोल बालवडकर, रवी टिंगरे, विशाल मलके यांनी या चर्चेत भाग घेत आरक्षण न वगळता अन्य ठिकाणी 'भारत मंडपम' व्हावे, अशी मागणी केली. काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी या जागेवरील एका बिल्डरची जागा या आरक्षणातून वगळण्यात आल्याचा आरोप करीत सामान्य नागरिकांच्या हिताचे आरक्षण रद्द केले जाते आणि बिल्डरला अभय दिले जाते, असा आरोप केला. तर शहराची मान उंचाविणारा हा प्रकल्प असल्याचे सांगत भाजप नगरसेवकांनी पाठराखण केली. भाजपकडून धीरज घाटे, श्रीनाथ भिमाले, पुनीत जोशी, सुरेंद्र पठारे, डॉ. श्रेयस खांदवे, अनिल सातव, अनिल टिंगरे यांनी या 'भारत मंडपम' आरक्षणाचे स्वागत केले.

दरम्यान, काँग्रेसचे गटनेते चंदू कदम म्हणाले, नागरिकांच्या हिताची आरक्षणे वगळून हा प्रकल्प राबविणे चुकीचे आहे. एवढ्या घाईने कोणाच्या फायद्यासाठी हा प्रस्ताव आणला जात आहे. त्यामुळे हा प्रस्ताव रद्द करून दुसरी पर्यायी जागा निवडावी, अशी मागणी केली, तर मुलभूत सोयीसुविधांवर गदा आणणारा हा प्रस्ताव असल्याने शिवसेना ठाकरे पक्षाचे गटनेते नितीन गावडे यांनी विरोध दर्शविला. विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी 'भारत मंडपम'ला विरोध नसल्याचे स्पष्ट करीत विमानतळ परिसरात वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर आहे, त्यामुळे दुसरीकडे या आरक्षणाचा विचार करावा, अशी मागणी केली. दरम्यान, ही आरक्षणे अन्यत्र टाकण्याची राष्ट्रवादीने दिलेली उपसूचना मागे घेतली. तर, काँग्रेसने 'भारत मंडपम'चे अन्य दुसऱ्या जागेवर आरक्षण टाकण्याची उपसूचना दिली. त्यावर मतदान झाल्याने बहुमताने ती फेटाळण्यात आली. त्यामुळे मुख्य प्रस्तावावरील मतदानादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपला साथ दिली. त्यामुळे 143 विरुद्ध 18 अशा बहुमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

# खडकवासल्यातून सुमारे 2 कोटी लिटर पाणी गेले वाया

## उन्हाळी आवर्तनास बसणार तडाखा, दुरुस्तीसाठी चार दिवस

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणाच्या नवीन उजवा मुठा कालव्यास मुंढवा भागातील शिंदे वस्तीत (किलोमीटर २२) अचानक भगदाड पडल्यामुळे सुमारे २ कोटी लिटर पाणी (२० एमएलडी) वाया गेले. भगदाड कशामुळे पडले, याचे कारण अजूनही अस्पष्ट आहे. यामुळे उन्हाळी आवर्तनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भगदाड भरण्यासाठी किमान चार ते पाच दिवसांचा कालावधी लागणार आहे, अशी माहिती खडकवासला प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी दिली.



कालव्याला भगदाड पडल्याची माहिती मिळताच 'जलसंपदा'च्या खडकवासला प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांच्यासह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर खडकवासला धरणातून कालव्यावाटे वाहणारे पाणी बंद केले. कालवा सकाळी सहा वाजण्याच्या आसपास फुटला असून, त्यामधील पाणी कमी होण्यास दुपारचा एक वाजला. भगदाड पडलेल्या ठिकाणचे पाणी बंद करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात आले. मात्र, उशिराने पाण्याचा प्रवाह थांबला. दरम्यान, पडलेले भगदाड भरण्यासाठी किमान चार ते पाच दिवसांचा कालावधी लागणार आहे. तसेच भगदाड कशामुळे पडले. याचे कारण अजूनही अस्पष्ट आहे. भगदाड पडल्यामुळे उन्हाळी आवर्तनावर परिणाम होण्याची शक्यता आहे, अशी माहिती देशमुख यांनी दिली.

खडकवासला धरणामधून नवीन उजवा कालवा थेट इंदापूरपर्यंत असून, याची लांबी १३४ किलोमीटर आहे. शहरातून हा कालवा वाहत आहे. मागील अनेक वर्षांपासून या कालव्याच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली असून, राडारोडादेखील टाकण्यात येत असल्यामुळे या कालव्याची खोली कमी झाली आहे. . दरम्यान, या कालव्याचे बांधकाम १९६५ मध्ये पूर्ण झाले. त्यामुळे हा कालवा अत्यंत जुना झाला असून, वारंवार पाणी गळती, अतिक्रमणे, राडारोडा टाकण्यात येत असल्यामुळे कालवा फुटण्याच्या घटना घडत आहेत.

> “ शिंदे वस्ती येथे नवीन उजवा मुठा कालव्याचे मोठे भगदाड पडल्यामुळे सुमारे २० एमएलडी पाणी वाया गेले. या कालव्याचे काम पूर्ण करण्यास किमान तीन ते चार दिवसांचा कालावधी लागणार आहे. कालवा कशामुळे फुटला, याची माहिती घेण्याचे काम सुरू आहे.
>
> - किरण देशमुख, कार्यकारी अभियंता, खडकवासला प्रकल्प.

# जिल्ह्यातील रस्त्यांची कामे 25 मेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश

## जिल्हा परिषदेकडून विकासकामांना गती; शिक्षण, आरोग्य व सौरऊर्जा प्रकल्पांवर विशेष भर

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्यापूर्वी रस्तेविकासाची कामे पूर्ण करण्याच्या उद्देशाने बांधकाम विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील रस्त्यांच्या डांबरीकरणाची सर्व कामे 25 मेच्या आत पूर्ण झाली पाहिजेत, असे आदेश प्रशासनाला दिल्याची माहिती जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या वेळी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील उपस्थित होते. जगदाळे म्हणाले, पावसाळ्यात नागरिकांची गैरसोय होऊ नये आणि कामाचा दर्जा टिकून राहावा, यासाठी ही कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. जि. प. प्रशासनाने नुकत्याच सादर केलेल्या 301 कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाच्या अंमलबजावणीबाबत आता अधिक काटेकोर भूमिका घेतली जाणार आहे. आत्तापर्यंत या अर्थसंकल्पापैकी केवळ सुमारे 60 टक्के निधी खर्च होत असल्याचे निदर्शनास आले असून, उर्वरित निधी वापरला जात नव्हता. या पार्श्वभूमीवर उपलब्ध असलेला संपूर्ण निधी प्रभावीपणे खर्च करण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार आहेत.

**रिक्त पदांचा प्रश्न ऐरणीवर**

सध्या शिक्षण विभागात 4 गटशिक्षण अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. आगामी मे महिन्यात आणखी काही अधिकारी निवृत्त होणार असल्याने ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. या रिक्त जागांमुळे कामाचा ताण वाढत असून, यावर लवकरात लवकर तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे जगदाळे यांनी सांगितले.

### शिक्षण आणि आरोग्यावर विशेष भर

» ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांची पटसंख्या जास्त आहे, अशा शाळांना 'मॉडेल स्कूल' म्हणून विकसित केले जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण मिळणे सुलभ होईल. त्याचबरोबर, पर्यायी ऊर्जास्रोतांचा वापर वाढविण्यासाठी जिल्हा परिषदेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. येणाऱ्या काळात जिल्ह्यातील 40 प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि 300 शाळांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. यामुळे वीजबिलात बचत होण्यासोबतच आरोग्य केंद्र आणि शाळांना अखंडित वीजपुरवठा मिळण्यास मदत होईल.

### एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात पुरवणी अर्थसंकल्प

» जिल्ह्याच्या विकासासाठी निधीची कमतरता नाही. मात्र, उपलब्ध निधी वेळेत खर्च न होणे, ही चिंतेची बाब आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे विकासकामांना खीळ बसू नये, यासाठी आता ठोस पावले उचलली जाणार आहेत. सध्याच्या लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या विकासकामांचा आणि सूचनांचा अंतर्भाव करण्यासाठी एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पुरवणी अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. यात प्रलंबित कामांना गती मिळेल आणि नियोजित योजनांसाठी अतिरिक्त तरतूद उपलब्ध करून दिली जाईल.